महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका,
जावक क्र.:- मआ/वृप्रा/११/७३४
दिनांक - ०३/०६/२०२६

कार्यालयीन परिपत्रक

विषय - सन २०२६-२०२७ या कालावधीत "हरित पुणे,समृद्ध पुणे" मोहिमेअंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांनी वृक्षांची लागवड करणेबाबत.

पुणे शहराच्या पर्यावरणाचे संतुलनासाठी व शहराचे तापमान आरोग्याचे दृष्टीने योग्य राहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण व संवर्धन करणे काळाची गरज आहे. पुणे शहर हरित होण्याच्या दृष्टीने वृक्ष प्राधिकरणामार्फत सन २०२६-२०२७ या कालावधीत "हरित पुणे,समृद्ध पुणे" मोहिमेअंतर्गत पावसाळी हंगामामध्ये स्थानिक वृक्षांची लागवड करणेचे नियोजन करण्यात येत आहे.

पर्यावरण संवर्धन आपल्या सर्वांची प्राथमिक जबाबदारी असून, पुणे महापालिकेच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी सक्रीय सहभाग घेणे क्रमप्राप्त आहे.

यास्तव प्रस्तुतच्या कार्यालयीन परिपत्रकान्वये सूचित करण्यात येते कि, यावर्षी पुणे महानगरपालिका मार्फत सन २०२६-२०२७ या कालावधीत पुणे महानगरपालिकेच्या प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी ५ जून २०२६ रोजी किमान १ वृक्षाची लागवड करावी व २ वर्ष वृक्षाचे संगोपन करून पुढील काळात वृक्ष जतन होतील याची दक्षता घ्यावी.

संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी वृक्ष लागवड केल्यानंतर सोबत जोडलेल्या "परिशिष्ट -अ" तक्त्यामध्ये विभागनिहाय फोटोसह माहिती भरण्यात यावी व सदर माहिती सह महापालिका आयुक्त तथा सदस्य सचिव, वृक्ष प्राधिकरण यांचेकडे सादर करावी.

(नवल किशोर राम)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत - १) अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष/जनरल/इस्टेट),पुणे महानगरपालिका
२) सर्व खाते प्रमुख
३) उप आयुक्त (परिमंडळ क्र. १ ते ५)
४) महापालिका सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी (सर्व १ ते १५ क्षेत्रीय कार्यालय)

परिशिष्ट - अ

विभागाचे नाव - .....

दिनांक - ..... ते दिनांक ..... या कालवधीत करण्यात आलेल्या वृक्ष लागवडीचा अहवाल

अ.क्र.	वृक्ष लागवड करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्याचे नाव व संपर्क क्रमांक , ई मेल आयडी	वृक्ष लागवडीचा दिनांक	वृक्ष लागवडीचे ठिकाण	वृक्ष लागवडीचे ठिकाणचा अक्षांश व रेखांश	लागवड करण्यात आलेल्या रोपांचे नाव व संख्या	वृक्ष लागवडी पूर्वीचे जीपीएस फोटो गुगल लिंक	वृक्ष लागवडीनंतरचे जीपीएस फोटो गुगल लिंक